देशदूत

अर्थसंकल्प–2024

धुळे आवृत्ती ।
बुधवार, दि. २४ जुलै २०२४ । पान – ८

डॉ. ऑर्थोच का विकत घ्यावे?

गुडघा दुखी कंबर दुखी खांदे दुखी मनगट दुखी

मिळते-जुळते नाव, जाहिरातींपासून सावधान

Clinically Tested*
*For efficacy and safety.

सांध्यांच्या वेदनांसाठी प्रभावी औषध

८ गुणकारी आयुर्वेदिक तेलांनी निर्मित डॉ. ऑर्थो तेल सांध्यांचे दुखणे मुळापासून कमी करण्यास विशेष सहाय्य करते. मात्र ८-१० मिली तेल दिवसातून एक-दोन वेळा हलक्या हातांनी पीडित जागेवर मालिश करा.

थेंबाथेंबात प्रभाव

Dr. Juneja's डा.ऑर्थो®
Ayurvedic Oil, Capsules, Spray & Ointment

Helpline : 7876977777 • www.drorthooil.com

देशवासीयांची मनं जिंकणारा अर्थसंकल्प

मुंबई । वृत्तसंस्था

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातला पहिला अर्थसंकल्प ईीवसशीं सादर केला. या अर्थसंकल्पात मध्यमवर्गीय, नोकरदार वर्ग, शेतकरी, बेरोजगार, महिला यांच्या दृष्टीने जाहीर करण्यात आल्याचं निर्मला सीतारमण यांनी म्हटलं आहे. तसंच नोकरदार वर्गासाठी खास टॅक्स स्लॅबमध्येही बदल करण्यात आला आहे.

मोदी सरकारचा हा १३ वा अर्थसंकल्प आहे. तर निर्मला सीतारमण यांनी सातव्यांदा अर्थमंत्री म्हणून देशाचा अर्थसंकल्प सादर केला आहे. आज सादर झालेल्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांवरही अधिक भर देण्यात आला आहे. विरोधकांनी या अर्थसंकल्पावर टीका केली आहे. मात्र दुसरीकडे महाराष्ट्रातून अर्थसंकल्पाचं कौतुक होतं आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पाचं आणि निर्मला सीतारमण यांचं कौतुक केलं आहे. तसंच चांगला अर्थसंकल्प केल्याबद्दल त्यांना धन्यवादही दिले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात तिसऱ्या एनडीए सरकारचा पहिला अर्थसंकल्प महाराष्ट्र आणि देशवासीयांची मनं जिंकणारा अर्थसंकल्प ठरला आहे असं उपमुख्यमंत्री तथा राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. मध्यमवर्गीय आणि नोकरदार वर्गाच्या आशा-आकांक्षा-अपेक्षांची पूर्तता करणारा, शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, सहकार, रोजगार, स्वयंरोजगार, विज्ञान, संशोधन, कौशल्यविकास, सामाजिक न्याय, महिला सक्षमीकरण अशा सर्व क्षेत्रांच्या विकासाला बळ देणारा, मजबूत-विकसित भारताची पायाभरणी करणारा, देशाला विश्वशक्ती बनवण्याच्या वाटेवर नेणारा हा अर्थसंकल्प आहे. शहरी व ग्रामीण विकासाचा समतोल साधणारा, समाजातील दुर्बल, वंचित, उपेक्षित, मागास, अल्पसंख्याक घटकांच्या विकासावर भर देणारा एक चांगला, दूरदृष्टीपूर्ण, लोककल्याणकारी अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो,असेही अजित पवार यांनी म्हटलं आहे. तसंच, या अर्थसंकल्पातून नेमकं काय मिळालं तेदेखील अजित पवार यांनी सांगितलं आहे.

शेती क्षेत्रात उत्पादकता वाढ, रोजगार, स्वयंरोजगार, कौशल्यविकासावर भर, मनुष्यबळ विकास व सामाजिक न्यायाकडे विशेष लक्ष, उत्पादन व सेवाक्षेत्राचा विकास, शहरांच्या नियोजनबद्ध विकासावर भर, ऊर्जासंरक्षण, पायाभूत सुविधांचा विकास या सगळ्यांचा विचार करुन हा अर्थसंकल्प जाहीर करण्यात आल्याचं अजित पवार म्हणाले.

विकसित भारत संकल्पनेला बळ

मुख्यमंत्री शिंदेंनी समजावला अर्थसंकल्प

मुंबई । वृत्तसंस्था

करसचनेत मोठे बदल करून सर्वसामान्यांना दिलासा देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोट्यवधी देशवासियांचा विश्वास सार्थ ठरविला. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला हा अर्थसंकल्प शेतकरी, महिला, युवा, कौशल्य विकास, रोजगार, पायाभूत सुविधांची उभारणी, शहरांचा विकास अशा विविध नऊ घटकांवर लक्ष केंद्रीत करणारा नवरत्न अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया व्यक्त करतानाच युवकांच्या कल्याणासाठी भरीव तरतूद, रोजगाराला चालना देणारा आणि विकसित भारत संकल्पनेला बळ देणारा असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज २३ जुलै रोजी केंद्राचा अर्थसंकल्प सादर केला. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, गरीब, महिला, युवा, शेतकरी या घटकांवर भर देतानाच कृषी व संलग्न क्षेत्रांसाठी १.५२ लाख कोटींची तरतूद तसेच शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढवण्यासाठी डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर पुरविण्याचा निर्णय हा कृषी क्षेत्राबरोबरच शेतकऱ्यांना बळ देणारा आहे. तसेच, एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी प्रोत्साहन देण्याचा निर्णय हा काळाची गरज असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. राज्य शासनाने देखील महाराष्ट्रात

नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी पावले उचलल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

नवीन करसचना ही सामान्यांना, नोकरदारांना दिलासा देणारी असून त्याचे मी स्वागतच करतो. या नव्या करसचनेमुळे करदात्यांची संख्याही वाढेल. यातून विकासाला आवश्यक असणारे करसंकलनातही महाराष्ट्रात अग्रेसर राहील. या अर्थसंकल्पात शेती क्षेत्रातील उत्पादकता, रोजगार व कौशल्य विकास, मनुष्यबळ विकास व सामाजिक न्याय, उत्पादन व सेवा, शहरी विकास, उर्जा संरक्षण, पायाभूत संरचना, संशोधन व विकास, नव्या पीढीतील सुधारणा या नऊ घटकांचा प्रामुख्याने विचार करण्यात आल्याने सर्वसमावेशक असा हा अर्थसंकल्प असल्याचे सांगत ग्रामीण भारताच्या विकासासाठी केलेली २.६६ लाख कोटी रुपयांची तरतूद खेड्यांचा कायापालट करणारी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

५० लाख अतिरिक्त रोजगार

आपला देश युवांचा आहे असे नेहमी म्हटले जाते. त्याचे प्रतिबिंब आजच्या अर्थसंकल्पात पहायला मिळाले असून युवा वर्गासाठी मोठ्या प्रमाणात तरतुदी करण्यात आल्या आहेत पहिल्यांदाच रोजगारासाठी तयार झालेल्या युवकांना एक महिन्याचा भत्ता पहिल्या महिन्यात देण्याचा निर्णय हा युवांसाठी दिलासा देणारा आहे. ५० लाख अतिरिक्त रोजगार निर्माण करण्याचा देखील निर्धार अर्थसंकल्पातून करण्यात आला आहे. यामुळे महाराष्ट्रातील युवकांनाही रोजगाराची मोठी संधी निर्माण होणार आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

अर्थसंकल्पात सर्वांना समान न्याय

मुंबई । वृत्तसंस्था

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज एनडीए सरकारचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रासाठी मोठ्या घोषणा करण्यात आल्या. विरोधकांनी या अर्थसंकल्पावर टीका केली आहे. महाराष्ट्रासाठी अर्थसंकल्पामधून काहीही मिळालं नाही, अशी टीका महाराष्ट्रातील विरोधी पक्षांच्या खासदारांनी केली. तसेच केंद्र सरकारच्या विरोधात खासदारांनी घोषणाबाजी केली. दरम्यान, आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पाचे कौतुक करत विरोधकांनी अर्थसंकल्पावर केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देत केंद्रीय अर्थसंकल्पामधून महाराष्ट्राला काय मिळालं? याची यादीच त्यांनी वाचून दाखवली आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प हा भविष्याचा वेध घेणारा अर्थसंकल्प आहे. देशाचा अर्थसंकल्प देशातील युवा, गरीब आणि शेतकऱ्यांना डोळ्यासमोर ठेवून सादर करण्यात आला आहे. अनेक प्रगत देश अर्थव्यवस्थेशी झुंजत आहेत. अशा परिस्थितीत भारताने ८.२ टक्याची वाढ दाखवली आहे. ही वाढ भारताच्या अर्थव्यवस्थेच्या ताकदीचा अनुभव करुन देणारी वाढ आहे. २०२३-२४ मध्ये सामाजिक क्षेत्राचा खर्च दुप्पट झाला असून जवळपास ११ लाख कोटी वरून २३ लाख कोटीवर गेला आहे. तसेच आरोग्य क्षेत्राचा खर्च २०१७-१८ च्या तुलनेत आता जवळपास दुप्पट झाला आहे. २.५ लाख कोटीवरून ५.८५ लाख कोटीवर गेला आहे, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

तसेच वित्तीय तूट देखील कमी होताना दिसत असून अर्थव्यवस्था आणखी मजबूत होत आहे. तसेच लाभार्त्यांच्या खात्यात ४० लाख कोटी रुपये थेट जमा करण्याचं काम मोदी सरकारने केलं आहे. भारताच्या भविष्यात मोठी गुंतवणूक करणारा हा अर्थसंकल्प आहे. शेतकरी, महिला, युवा, गरीब या चार घटकांना समोर ठेऊन हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. तसेच रोजगाराच्या क्षेत्रात आता अ‍ॅप्रेंटशीपची योजना केंद्राने सुरु केली आहे. या योजनेतून तरुणांना रोजगार मिळण्यासाठी मदत होणार आहे. तसेच तीन कोटी अतिरिक्त घरे बांधण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. सर्वच क्षेत्रात रोजगार निर्माण होतील, देशात गुंतवणुकीला मोठा फायदा होईल. तसेच मुद्रा लोन १० लाखांपर्यंत कोणत्याही गॅरंटी शिवाय आधी मिळत होतं. आता २० लाख रुपयांपर्यंत मुद्रा लोन कोणत्याही गॅरंटी शिवाय मिळणार आहे. एक कोटी कुटुंबांना ३०० युनीट वीज मोफत देण्यात येणार आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते पुढे म्हणाले, या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून ११ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक पायाभूत सुविधांसाठी होणार आहे. दीड लाख कोटी रुपयांचं व्याजमुक्त कर्ज ५० वर्षांसाठी आणि १५ वर्षांसाठी अशा दोन योजना केंद्राने राज्यांसाठी आणल्या आहेत.

बजेटमधून शेजारील राष्ट्रांनाही भरभरुन दिले

मोदींची विश्वबंधुत्वाची संकल्पना साकारण्याचा प्रयत्न

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आर्थिक वर्ष २०२४-२५ यासाठीचा अर्थसंकल्प संसदेत सादर केला. या बजेटमधून भारतानं शेजारील राष्ट्रांनाही चांगला निधी उपलब्ध करून दिला आहे. अफगाणिस्तानात सध्या तालिबान राजवट असून यंदाच्या बजेटमध्ये २०० कोटी निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. मागील वर्षीही इतकीच रक्कम ठरली होती मात्र त्यानंतर २२० कोटी देण्यात आले होते. अलीकडच्या काळात भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील संबंध सुधारले आहेत. यंदाच्या अर्थसंकल्पात भारताचा आणखी एक महत्त्वाचा शेजारील देश भूतानसाठी २ हजार ६८ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. बजेटमध्ये बांगलादेशाला १२० कोटी, नेपाळला ७०० कोटी, श्रीलंकेला २४५ कोटी, मालदीवला ४०० कोटी, म्यानमारला २५० कोटी, आफ्रिकन देशांना २०० कोटी राखीव ठेवण्यात आले आहेत. यूरोपियन देशांसाठी २० कोटी, अमेरिकन देशांसाठी ३० कोटी तर दुसऱ्या विकसनशील देशांसाठी १२५ कोटी, मॉरिशससाठी ३७० कोटी प्रस्तावित आहेत. चाबहार पोर्टच्या विकासासाठी १०० कोटींची तरतूद ठेवण्यात आली आहे. बजेटमध्ये महत्त्वाच्या घोषणा यंदाच्या बजेटमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील सरकारने अनेक महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत. या बजेटमध्ये २.६६ लाख कोटी ग्रामीण क्षेत्राच्या विकासासाठी राखीव आहेत. कृषी क्षेत्रासाठी १.५२ लाख कोटी देण्यात येणार आहेत. पगारदार वर्गासाठी यंदा आयकरात स्टँडर्ड डिडक्शन मर्यादा ५० हजाराहून ७५ हजारापर्यंत केली आहे. आयकर कायद्याचा सहा महिन्यात आढावा घेतला जाणार आहे. आयकर प्रक्रिया सुलभ बनवली जाईल तसेच टीडीएस वेळेवर न देणं गुन्हा मानलं जाणार नाही.

विधीलिखित

सुरेशराव बोरकर,
ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय, रावेर.
मो. : ९८५००१५५५८

बुधवार, दि. २४ जुलै २०२४

*_*_*_* दैनंदिन राशिभविष्य *_*_*_*

मेष – सांसारीक वाद असतील ते मिटतील.
वृषभ – धार्मिक कार्यात सहभागी व्हाल.
मिथुन – नवीन कार्य करण्यास उत्तम योग आहे.
कर्क – मानसिक चिंता प्रसंग निर्माण होतील.
सिंह – विवाह योग प्रबळ आहेत.
कन्या – शारीरिक व्यथा या जाणवू लागतील.
तूळ – नवीन शुभ कार्याची सुरुवात होईल.
वृश्चिक – सुख संपदा योग प्रभावी आहेत.
धनू – नोकरी इच्छुकांनी नौकरीच्या संधी प्राप्त होतील.
मकर – आर्थिक लाभ घडतील.
कुंभ – स्वत:चे कार्य स्वत: करावे लागेल.
मीन – आर्थिक प्रगतीचा दिवस राहणार आहे.

धोरण अन् व्हिजन नसलेला अर्थसंकल्प - नाना पटोले

मुंबई । वृत्तसंस्था

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात फक्त मोठमोठे आकडे आणि आकर्षक घोषणा आहेत. अर्थसंकल्पात कोणतेही धोरण आणि व्हिजन नाही. गेल्या १० वर्षापासून मोदी सरकारच्या अर्थसंकल्पात जनतेच्या हितापेक्षा हेडलाईन मॅनेजमेंटचीच काळजी घेतलेली दिसते, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

संसदेत आज सादर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना पटोले म्हणाले, देशात आज बेरोजगारीची मोठी समस्या असताना तरुणांना पक्क्या नोकऱ्या देण्यासाठी सरकारकडे कोणतेही ठोस धोरण नाही. शेतकऱ्यांना दिलासा देणारी एकही योजना अर्थसंकल्पात दिसत नाही. महागाईने त्रस्त जनतेला दिलासा देण्यासंदर्भात तरतूद नाही. एनडीए सरकारच्या अर्थसंकल्पाने सर्व घटकांची घोर निराशा केली असून शेतकरी, महिला, तरुण, विद्यार्थी, लघु, छोटे आणि मध्यम उद्योगासह सर्वसामान्यांची निराशा केली आहे. सरकार टिकवण्यासाठी बिहार आणि आंध्रप्रदेशला मोठा निधी आणि महाराष्ट्राच्या तोंडाला मात्र पाने पुसली आहेत. यावरून शिंदे-फडणवीस-अजित पवारांची केंद्रात काही पत नाही हे स्पष्ट झाले आहे.

जनगणनेसाठी सरकारने अर्थसंकल्पात कोणतीही आर्थिक तरतूद केलेली नाही. देशात मोठ्या प्रमाणात आर्थिक असामनता निर्माण झाली आहे. ती दूर करण्याबाबत सरकारकडे काही धोरण तर नाहीच पण सरकार त्याची साधी दखल घ्यायलाही तयार नाही हे यावरून स्पष्ट झाले आहे, असेही पटोले यांनी सांगितले.

पंतप्रधान मोदींची ‘नावडता महाराष्ट्र’ योजना

मुंबई । वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात केंद्र सरकारच्यावतीने अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी आज आपला अर्थसंकल्प सादर केला. त्यानंतर राज्य सरकारच्यावतीने अर्थसंकल्पाचं स्वागत केले जात असून महायुतीच्या सर्वच प्रमुख नेत्यांनी हा अर्थसंकल्प सर्वसामान्य, शेतकरी व महाराष्ट्राला समृद्ध करणारा असल्याचे म्हटले आहे. मात्र, दुसरीकडे विरोधकांनी अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना केंद्र सरकारला लक्ष्य केले आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रासोबत दुजाभाव करण्यात आल्याचं विरोधकांनी म्हटलं आहे.

उद्धव ठाकरे बजेटवर प्रतिक्रिया देताना म्हणाले, पंतप्रधान मोदींनी ‘नावडता महाराष्ट्र’ ही योजना सुरू केलेली दिसते. गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्र ओरबाडला व मुंबईची लूट केली, पण प्रत्येक बजेटमध्ये महाराष्ट्राची निराशाच केली. महाराष्ट्राने आणखी किती अन्याय सहन करायचा? पण दिल्लीचे बूट चाटणारे घटनाबाह्य सरकार बसले आहे, तोपर्यंत हा अन्याय सुरूच आहे. घटनाबाह्य सरकारची किंमत महाराष्ट्राला मोजावी लागत आहे, अशी संतापजनक प्रतिक्रिया दिली आहे.

दरम्यान, उद्धव ठाकरेंच्या टीकेला भाजपनेही ट्विट करुन प्रत्युत्तर दिलंय. त्यामध्ये, महाराष्ट्राला या बजेटमधून नेमकं काय मिळालं, याची माहितीच भाजपने दिलीय.

तसेच, ह्या अर्थसंकल्पात काँग्रेसच्या न्यायपत्रातील योजना राबवण्यात येत असून ही उचलेगिरी असल्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटलंय. आता, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे (णववहर्रीं ढहरलज्ञशीू) यांनीही बजेटवर ठाकरेस्टाईल प्रतिक्रिया दिली आहे. पंतप्रधान मोदींनी मनावडता महाराष्ट्रफ ही योजना सुरू केलेली दिसते, अशा शब्दात उद्धव ठाकरेंनी अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया दिली.

देशदूत

हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करुन देशदूत कार्यालय, ग.नं.६ राणी मेडिकलजवळ, धुळे-४२४००१ येथे प्रसिध्द केले. ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने*. फोन नं.**: धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४, नंदुरबार-२२११०१, जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४. **RNI.No. 68336/1998.** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)